महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/ 6324
दिनांक : २०/१०/२०२१

## आदेश

विषय:- कोरोना विषाणू (कोविड - १९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Break the Chain " सुधारित मार्गदर्शक सूचना
**सर्व कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत**

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
४) महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दि.१७.०४.२०२०,२१.०४.२०२०,२९.०६.२०२०,६.०७.२०२०,३१.०७.२०२० ३१.०८.२०२०,३०.०९.२०२०,१४.१०.२०२०,२३.१०.२०२०,३.११.२०२०, १४.११.२०२०,२३.११.२०२०,२७.११.२०२०,२१.१२.२०२०,२९.१२.२०२०, १४.०१.२०२१,१०.०२.२०२१,१५.०३.२०२१,१७.०३.२०२१,२७.०३.२०२१, ४.०४.२०२१,१३.०४.२०२१,२०.०४.२०२१,२१.०४.२०२१,२९.०४.२०२१, १२.०५.२०२१,३०.०५.२०२१,०४.०६.२०२१,१०.०६.२०२१,२५.०६.२०२१
५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५, दि.०२.०८.२०२१,दि.११.०८.२०२१,दि.२४.०९.२०२१
६) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३ दि.१३.१०.२०२१
७) महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, परिपत्रक क्रमांक : कृषिवि-३७२१/प्र.क्र.१४३/७-अे दि.२०.१०.२०२१
८) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/ ४२७६ दि.१४.०८.२०२१, ५३४३, दि. १७.०९.२०२१, ५३४५, दि.१७.०९.२०२१, ५५८५ दि.२५.०९.२०२१,५८७१, दि.०२.१०.२०२१,५९२५, दि.०४.१०.२०२१,५९४८, दि.०५.१०.२०२१,६०४८, दि.०८.१०.२०२१,६०४९, दि.०९.१०.२०२१,६१३१ दि.१३.१०.२०२१,६२३८, दि.१४.१०.२०२१,६२८९, दि.२०.१०.२०२१

पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE EST.1950

ज्याअर्थी मे. महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत संदर्भ क्र.७ अन्वये दि.२०.१०.२०२१ रोजी सर्व कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करणेबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग

अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका,** पुणे महानगरपालिका क्षेत्रात सर्व कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक २० ऑक्टोबर २०२१ पासून सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश / मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग मे.महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांनी दि.२०.१०.२०२१ रोजी निर्गमित केलेल्या आदेश / मार्गदर्शक सूचनांनुसार दि.२०.१०.२०२१ पासून सुरु राहतील.

२) मे.महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, यांनी सर्व कृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करणेबाबत दिनांक २०.१०.२०२१ रोजीचे निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना ( SOP ) यासोबत संलग्न केलेले आहेत. तरी सदर आदेश / मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

३) सदर आदेश हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येणाऱ्या पुणे कटक मंडळ व खडकी कटक मंडळ यांना देखील लागू राहतील.

४) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि.२०.१०.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.२०.१०.२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन
सन-१९५०
EST.1950

स्वाक्षरी /xxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

निर्गमित

Raut

( रविंद्र बिनवडे )
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

**राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन,**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : कृषिवि-३७२१/प्र.क्र.१४३/७-अे,**
हुतात्म राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २०२१.

<u>संदर्भ :-</u> १. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३, दि.१३/१०/२०२१.
२. कृषि परिषद, पुणे कार्यालयाचे पत्र क्र. मकृप/शिक्षण-१/प्र.क्र.६५१८/२०४६/२०२१, दि.१४/१०/२०२१.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागात इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग दि. ०४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षांवरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले असण्याची शक्यता आहे. तसेच, राज्यातील कोव्हिड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उक्त संदर्भ क्र. १ येथील परिपत्रकान्वये सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांमधील नियमित वर्ग दि.२० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या धर्तीवर कृषि परिषद, पुणे कार्यालयाकडून संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित विद्यालये आणि महाविद्यालयांमधील प्रत्यक्षपणे नियमित वर्ग सुरु करण्याबाबत शासन परिपत्रक/ शासन निर्णय निर्गमित करणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयांमधील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

१. राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित शासकीय व खाजगी विना अनुदानित विद्यालये व महाविद्यालयांमधील नियमित वर्ग दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, विद्यापीठ/महाविद्यालयांचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरु करण्याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन विद्यापीठांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

२. १८ वर्षावरील विद्यार्थी ज्यांनी कोव्हिड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, तेच विद्यार्थी/विद्यार्थीनी विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील.

३. प्रतिबंधित प्रक्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय संबंधित विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर घ्यावा व त्यानुसार महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना/ मानक कार्य प्रणाली (एसओपी) देण्यात यावी.

४. राज्यातील सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

५. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, मुंबई यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

७. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोव्हिड-१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख/ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करुन घ्यावी.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२११०२०१२१३१३९३०१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Balasaheb Kisan Raskar

Digitally signed by Balasaheb Kisan Raskar
DN: CN = Balasaheb Kisan Raskar, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = AGRICULTURE AND ADF DEPARTMENT
Date: 2021.10.20 12:16:08 +05'30'

( बा.कि.रासकर )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८. मा. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय मुंबई
९. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर,पुणे.
११.मा. कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली.
१२.मा. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी, जि. अहमदनगर.
१३.मा. कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला.
१४.मा. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
१५.सर्व महानगरपालिका आयुक्त
१६.सर्व जिल्हाधिकारी
१७.निवडनस्ती.